REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख ७ ऑगस्ट, १९४० | अंक ३२

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें.
एजन्सीकरितां आजच लिहा.

पूर्ण स्वदेशी
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा, विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १५ आणे व्याज

३० जुलै अखेर संपलेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १५ आणे इतका पडला.

### टेलिफोनच्या दराची नवी पद्धति

टेलिफोनवर शहरांतल्या शहरांत बोलावयाचें असल्यास त्यासाठी प्रत्येक वेळेचा दर ठरवून दिल्यास तो सध्याच्या मासिक ठराविक दरापेक्षा स्वस्त पडेल आणि त्यामुळें अनेक लहान असामींस तो सोईचा पडेल, असें डायरेक्टर जनरल ऑफ पोस्ट्स ॲन्ड टेलिग्राफ्स हे नुकतेच म्हणाले.

### दुकानांतील कामाच्या तासांचें नियंत्रण

बॉंबे शॉप्स ॲंड एस्टॅब्लिशमेंट्स ॲक्टानें दुकानांतील नोकरांचे कामाचे तास नियंत्रित केले आहेत. हा कायदा मुंबई, अहमदाबाद, सोलापूर आणि पुणें ह्या शहरांत अंमलांत यावयाचा आहे. ह्या संबंधांतील प्रश्नांची चर्चा करण्यासाठी ह्या शहरांच्या म्युनिसिपालिटयांच्या प्रतिनिधींची एक परिषद् मुंबईच्या गव्हर्नरांचे सल्लागार, मि. नाइट, ह्यांचे अध्यक्षतेसाठी भरली होती. मुंबई शहरांतील सुमारें २ लक्ष लोकांस ह्या कायद्याचा फायदा मिळेल.

### रेल्वेचे नवीन फाटे

१९३८-३९ मध्यें हिंदी रेल्वेजचे ५ नवीन फाटे सुरू झाले, ५ फाटे तयार होत होते आणि सहा फाट्यांची योजना मंजूर झाली.

### अंडीं

हिंदुस्थानांत दरसाल ३ अब्ज, ३६½ कोटि अंडीं तयार होतात. ब्रह्मदेशांत १६½ कोटि अंडीं निघतात. विकलेल्या अंड्यांचें उत्पन्न ५½ कोटि रुपये होतें. कोंबड्यांची किंमत ७½ कोटींवर आहे. अंडीं फुटणें, इत्यादींमुळें शेतकऱ्यांस दरसाल सुमारें ५७ लक्ष रुपये नुकसान सोसावें लागतें. अंड्यांची प्रतवारी लावणारीं हिंदुस्थानांत एकूण १५० केंद्रें असून तेथें प्रत्यहि ५० हजार अंड्यांची प्रतवारी लावली जाते.

### लाचलुचपतीस आळा

लाचलुचपतीस आळा घालण्यासाठी सिंध सरकार एक खास अधिकारी नेमणार आहे.

### महारोगी

हिंदुस्थानांत सुमारें १० लक्ष लोक महारोगी आहेत. ह्या रोगाचा फैलाव मुख्यतः खेडेगांवांत असला, तरी आतां वाढत्या दळणवळणामुळें शहरांतहि तो रोग पसरूं लागला आहे. हिंदुस्थानाच्या पूर्वभागांत महारोगाचें प्रमाण अधिक आढळतें, तें जसजसें पश्चिमेकडे व उत्तरेकडे जावें, तसतसें कमी कमी होत जातें. मुंबई प्रांताचा उत्तर भाग, गुजरात, रजपुताना, संयुक्त प्रांताचा पश्चिम भाग, पंजाब, सरहद्द प्रांत, सिंध व बलुचिस्तान येथें महारोगाचा उपसर्ग फार अल्प आहे.

### कर्नल मेरी बूथ

सॅल्व्हेशन आर्मीच्या बेल्जममधील प्रमुख, कर्नल मेरी बूथ ह्यांस जर्मन सरकारनें अटकेंत ठेवलें आहे.

### अपघातांमुळें नुकसान

कारखान्यांतील अपघातांमुळें उद्योगधंद्यांचें १९३८ सालीं सुमारें ८० लक्ष रुपयांचें नुकसान झालें.

### कोकोचा नाश

आफ्रिकेंतील गोल्ड कोस्ट कॉलनी ह्या ब्रिटिश वसाहतीमधील कोकोच्या पिकाचा उठाव कसा करावा, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. जर्मनी, हॉलंड व स्कँडिनेव्हिया प्रांत मिळून गोल्ड कोस्टच्या कोकोपैकी एक तृतीयांशाचा खप होत असे, तो आतां बंद झाला आहे व त्यांस नवीन गिऱ्हाइकहि मिळालेलें नाहीं. त्यामुळें कांहीं कोकोचा मुद्दाम नाश करण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

### अपील काढून घेतलें

मालमत्तेवरील कराबाबत मुंबई हायकोर्टाच्या निकालावर सर बेरामजी जिजिभाई व श्री. जगमोहनदास कल्याणदास ह्यांनीं फेडरल कोर्टाकडे अपील केलें होतें, तें त्यांनीं काढून घेतलें आहे.

### ब्रिटिश ओव्हरसीज कॉटन लि.

कपास कापडाची निर्गत वाढविण्यासाठी कॉटन बोर्डास मदत करण्याकरितां इंग्लंडमध्यें वरील नांवाची कंपनी स्थापन करण्यांत आली आहे.

### विमा कायद्यांत दुरुस्ती

हिंदी विमाकायद्यांत हिंदुस्थान सरकारनें कांहीं दुरुस्त्या सुचविल्या आहेत, त्यांचा विचार करण्याकरितां व्यापारमंत्रि, सर रामस्वामी मुदलियार, हे ऑगस्ट अखेर विमाव्यवसायी लोकांची एक परिषद् बोलावणार आहेत.

### डिफेन्स सेव्हिंग्ज प्रॉव्हिडंट फंड

युद्ध कर्जांत रकम गुंतविण्यास सोईस्कर साधन उपलब्ध व्हावें, अशी सरकारी नोकरांची तीव्र इच्छा आहे, तिला अनुसरून, सरकारनें डिफेन्स सेव्हिंग्ज प्रॉव्हिडंट फंड काढला आहे. त्यांत मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचा सर्व नोकरांस पैसे ठेवतां येतील. व्याजाचा दर ३% आहे.

### फ्रेंच बँकांवर जर्मनीची सत्ता

फ्रान्सचीं सांपत्तिक साधनें स्वतःच्या उपयोगास लावण्याचा पद्धतशीर प्रयत्न जर्मनी करीत आहे. फ्रेंच बँकांवर आपला ताबा जर्मनांनीं लावला असून फ्रान्सच्या मध्यवर्ती बँकेचीहि तीच अवस्था केली आहे.

### हिंदुस्थान सरकारच्या नव्या कर्जास मागणी

हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या नव्या कर्जास जनतेकडून चांगली मागणी येत आहे. त्यांत आजवर घालण्यांत आलेल्या रकमा अत्यंत उत्तेजनकारक आहेत.

### दहा हजार कुशल यांत्रिक कामगार पाहिजेत

युद्ध सामुग्री झपाट्यानें तयार करण्यासाठी हिंदुस्थान सरकारास कुशल यांत्रिक कारागीरांची आवश्यकता आहे. त्या संबंधांत चौकशी करण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली होती, तिनें दहा हजार कामगारांबाबतची एक योजना तयार केली आहे.

### हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार वाढत आहे

एप्रिल ते जून ह्या तिमाहीच्या हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या आकड्यांवरून ह्या व्यवहारांत वाढ झालेली दिसून येते. हिंदी मालाची ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांत मालाची निर्गत मोठ्या प्रमाणांत वाढली.

### मुंबईचा युद्धसहाय फंड

मुंबईच्या युद्ध सहाय फंडाचा आकडा सव्वा आठ लक्ष रुपयांचे वर गेला आहे.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३७४ | ५ कागद बनवण्याचें संशोधन केंद्र ... | ३७९ |
| २ हिंदी चलन व्यवस्थेचा वृत्तांत ... | ३७५ | ६ हिंदी रिझर्व्ह बँक ... | ३८० |
| ३ विद्यार्थ्यांची घडामोड... | ३७६ | ७ चतुःशृंगी को. के. सोसायटी ... | ३८० |
| ४ स्फुट विचार ... | ३७७ | ८ विटें मर्चंट्स को. बँक लि. | ३८० |
| युरोपच्या व्यापाराची नाकेबंदी—अमेरिका खंड सावध झालें—विन व्याजी सरकारी कर्जें—शुगर सिंडिकेटचें शिष्ट मंडळ—शुगर सिंडिकेटला पुनः मान्यता मिळाली—डॉलर रुपया हुंडणावळ— | | ९ गेल्या वर्षांतील औद्योगिक उत्पादन ... | ३८१ |
| | | १० गिरणी मालक संघाचा अहवाल ... | ३८१ |
| | | ११ करार कोठें झाला ! | ३८२ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ३८३ |

# अर्थ

बुधवार, ता. ७, ऑगस्ट १९४०

## हिंदी चलनव्यवस्थेचा वृत्तांत

### (१)

### नाणेंबाजार आणि बँकिंग

देशाच्या चलनाची व्यवस्था रिझर्व्ह बँकेकडे गेल्यापासून त्यासंबंधांतला कारभार आणि आनुषंगिक परिस्थिति ह्या विषयींचा वार्षिक वृत्तांत प्रसिद्ध करण्याचें काम ह्या संस्थेकडे आलें आहे. १९३९-४० सालाबावतच्या, त्या बँकेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालांत हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचा आढावा, हुंडणावळ, चलनाचा व्यवहार, बाजारभाव, सरकारी कर्जें, व्याजाचे दर, बँकांची स्थिति इत्यादि महत्त्वाच्या विषयांची उद्बोधक माहिति दिलेली आढळते. तिच्या आधारानें सदरहु प्रश्नांचें संक्षिप्त विवेचन येथें करण्याचें आम्हीं योजलें आहे. प्रस्तुत लेखांत नाणेंबाजार आणि बँकिंग ह्यांची परिस्थिति गेल्या सालीं कशी होती हें दर्शविण्यांत येईल. ह्या संबंधांत प्रथम व्यापारांत खेळणाऱ्या भांडवलावरील व्याजाच्या दराचा प्रश्न मुख्य आहे. मध्यवर्ती बँकेचा कर्जावरील व्याजाचा दर सर्व देशांत निर्णायक व सांपत्तिक स्थितीचा गमक समजला जातो. गेल्या वर्षी जगांतील अनेक देशांत बँक रेट अस्थिर होता आणि तो वर जाऊन खालीं आला. खुद्द इंग्लंडमध्यें बँक ऑफ इंग्लंडचा दर युद्धाच्या प्रारंभाचे पूर्वी २ टक्क्यांचा ४ टक्के करण्यांत आला होता तो सप्टेंबर अखेर ३ टक्के झाला आणि पुढें एक महिन्यानें पुन्हां २ टक्क्यांवर पूर्वस्थळीं आला. बँकांच्या कर्जावरील अल्प मुदतीच्या दरांत ह्याचप्रमाणें चढउतार झाला.

हिंदुस्थानांत रिझर्व्ह बँकेचा "बँक रेट," इंपीरिअल बँकेचा अल्प मुदतीच्या व पहिल्या प्रतीच्या कर्जावरील व्याजाचा दर व बाजारांतील हुंड्यांचा दर हे विचारांत घेतले तरच नाणें बाजाराच्या स्थितीची यथातथ्य कल्पना येते. १९३९-४० सालाच्या प्रारंभीं बँकांचा परस्परांस हुकमी कर्जें देण्याचा दर (कॉल रेट) २ टक्के होता, तो एक दोन महिन्यांत पैसा विपुल असल्यानें १ टक्क्यांवर घसरला. पुढें युद्धास प्रारंभ होतांच तो १¼% पर्यंत चढला आणि तीन महिने मुदतीच्या ठेवींचा व्याजाचा दर २½ टक्के झाला. ह्या दरांत चढउतार वर्षअखेरपर्यंत पैशास असलेल्या मागणीप्रमाणें होत गेला. बाजारांतील हुंडीचा दर ५ ते ६ टक्के कमी-ज्यास्त होत राहिला. रिझर्व्ह बँकेच्या दरांत मात्र चळविचल कांहींच झाली नाहीं. १९३५ च्या नोव्हेंबरपासून तो ३ टक्के कायम राहिला आहे.

### नाणें बाजारांतील व्याजाचे दर

| १९३९ | | बँक-रेट | कॉलमनी कलकत्ता | कॉलमनी मुंबई | इं. बँक हुंडी | बाजारांतील हुंडी कलकत्ता | बाजारांतील हुंडी मुंबई |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल | ,, | ३ | २ | २½ | ३ | ६-७ | ५¼ |
| मे | ,, | ३ | २ | २ | ३ | ६-७ | ५¼ |
| जून | ,, | ३ | १¼ | ¾ | ३ | ६-७ | ५½ |
| जुलै | ,, | ३ | ½ | ½ | ३ | ६-७ | ५¼ |
| ऑगस्ट | ,, | ३ | ¼ | ¼ | ३ | ६-७ | ५¼ |
| सप्टेंबर | ,, | ३ | ¾ | ¾ | ३ | ६-७ | ६ |
| ऑक्टोबर | ,, | ३ | ½ | ½ | ३ | ६-७ | ५¾ |
| नोव्हेंबर | ,, | ३ | ½ | ½ | ३½ | ६-७ | ५¾ |
| डिसेंबर | ,, | ३ | १ | १¼ | ३½ | ६-७ | ६⅜ |
| जानेवारी | १९४० | ३ | १¾ | २ | ३½ | ६-७ | ६¾ |
| फेब्रुवारी | ,, | ३ | १¾ | १½ | ३½ | ६-७ | ६¾ |
| मार्च | ,, | ३ | ¾ | १½ | ३½ | ६-७ | ६¾ |

१९३९-४० सालीं शेड्यूल्ड बँकांची कचेऱ्या, शाखा वगैरे मिळून एकूण संख्या १,२९० होती. पूर्वीच्या सालापेक्षा हा आकडा १४६ नीं अधिक होता. शाखांमध्यें झालेल्या वाढींत इंपीरिअल बँक ऑफ इंडिया व मोठाल्या बँका ह्यांचा हिस्सा फार मोठा होता. १९३५ सालापासून गेल्या मार्च अखेरपर्यंत शेड्यूल्ड बँकांच्या शाखांत वाढ कशी होत आली आहे हें खालच्या तक्त्यावरून दिसून येईल:—

### शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची वाढ

| वर्षें | | शेड्यूल्ड बँकांची संख्या | मुख्य व दुय्यम कचेऱ्या व शाखा |
|---|---|---|---|
| ३१ डिसेंबर, | १९३५ | ४९ | ७२३ |
| ,, ,, | १९३६ | ५० | ८२८ |
| ,, ,, | १९३७ | ५४ | १,१३८ |
| ,, ,, | १९३८ | ५७ | १,१२५ |
| ३१ मार्च, | १९३९ | ५६ | १,१४४ |
| ३० जून, | ,, | ५९ | १,१९८ |
| ३० सप्टेंबर, | ,, | ६० | १,२५२ |
| ३१ डिसेंबर, | ,, | ६१ | १,२७७ |
| ३१ मार्च, | ,, | ५९ | १,२९० |

रिझर्व्ह बँकेकडे शेड्यूल्ड बँकांची अल्प मुदतीच्या कर्जांची मागणी होते, ती तात्पुरत्या भांडवलाच्या मागणी-पुरवठ्याच्या बदलत्या स्थितीवर अवलंबून असते. १९३९-४० च्या प्रारंभीं पैशाच्या चणचणीमुळें २६४ लक्ष रुपयांचीं कर्जें रिझर्व्ह बँकेनें दिलीं. दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहींत हा आकडा ३ लाखांपर्यंत खालीं गेला आणि शेवटच्या तिमाहींत २२ लक्षांवर चढला. बिगर शेड्यूल्ड बँकांची संख्या १९३८ चे अखेर १,४२१ होती. कंपनी ॲक्टाच्या बँकेच्या व्याख्येंत आपण बसत नाहीं असें

त्यांपैकी अनेकांचें म्हणणें आहे आणि म्हणून त्यांमधील फक्त ६७२ नीं कायद्यास अनुसरून रिझर्व्ह बँकेकडे रोकड शिलके-बाबतचे तक्ते पाठवले. ह्या १,४२१ बँकांपैकी काय त्या १२६ बँकांचें भरणा झालेलें भांडवल व रिझर्व्ह मिळून पन्नास हजार रुपयांची रकम होत होती. ह्यावरून सदरहू संस्थांच्या आकाराची कल्पना येते. भागांचें अपुरें भांडवल, मुदतीच्या ठेवींचें प्राधान्य व सरकारी रोख्यांतल्या गुंतवणीचा अभाव ह्या गोष्टी सदरहू बँकांचे संबंधांत ठळकपणानें नजरेस येतात. हे दोष दूर होण्याचे दृष्टीनें बँकांच्या नियोजित कायद्याच्या मसुद्यांत तरतूद करण्यांत आली आहे, हें आम्हीं दाखवलेंच आहे.

## विवाहांची घडामोड

### इंग्लंडमधले कांहीं मनोरंजक आकडे

ग्रेटब्रिटनमध्यें होणाऱ्या विवाहांविषयींचे एका वर्षाचे ताजे आकडे एका इंग्रजी मासिकांत मनोरंजक रीतीनें पुढें मांडण्यांत आले आहेत, त्यांचा अनुवाद आम्हीं येथें करीत आहों:—

प्रत्येक दिवसाच्या चोवीस तासांतल्या प्रत्येक दीड मिनिटास ब्रिटनमध्यें एक विवाह सरासरीनें होतो. वृत्तांताच्या सालीं एकूण ३ लक्ष, ५९ हजार विवाह झाले. म्हणजे दर दिवशीं ९८५ जोडपीं विवाहबद्ध झालीं.

विवाहाची किमान वयोमर्यादा १६ वर्षें आहे. वधू-वरांच्या वयाची कमाल मर्यादा ९० पर्यंत क्वचित गेलेली आढळते. १६ व्या वर्षास विवाह करणारांत स्त्रियांचाच भरणा मुख्यत्वेंकरून आहे. ह्या वर्षाच्या वरांची संख्या केवळ २७ होती. वधू १,२३६ होत्या. एका टोकास अल्पवयी विवाहांत स्त्रियांचें संख्याधिक्य असतें तर दुसऱ्या टोकास वार्धक्यावस्थेंत लग्न करणारांमध्यें पुरुषांचाच भरणा असतो. ८० वर्षांवरील ७५ पुरुषांनीं विवाह केले; ह्या वयाच्या फक्त ९ स्त्रियांनीं त्यांचें अनुकरण केलें. ह्यावरून असें दिसतें कीं, सांसारिक जीवनाच्या शर्यतींत स्त्रिया घडाडीनें आघाडी मारतात, पण पुरुष चिमेपणानें शेवटपर्यंत टिकाव धरून रहातात.

एकविसाव्या वर्षाच्या मर्यादेच्या आंत झालेल्या विवाहांत स्त्रिया व पुरुष ह्यांचें परस्पर प्रमाण ५ ते १ असें होतें. त्यांची संख्या अनुक्रमें करून ५३,२७१ व ११,४९० अशी होती. २१ ते २५ ह्या वयाच्या दरम्यान विवाह करणाऱ्या पुरुषांची संख्या हळुहळु स्त्रियांच्या संख्येच्या बरोबरीस येते. स्त्री-पुरुषांची संख्या अनुक्रमें करून १,३९,८९९ व १,०७,०३८ होती. २५ ते ३० ह्या वर्षाच्या वर्गांत विवाह करणारे पुरुष स्त्रियांच्या पुढें जातात. त्यांची संख्या १,३८,४१० व ९८,३०८ अशी अनुक्रमेंकरून होती. ह्याच्या पुढील वयोमर्यादेंत पुरुषांची संख्या स्त्रियांच्या संख्येपेक्षा अधिक होती.

वीस ते तीस ह्या वयोमर्यादेंत होणाऱ्या विवाहांची संख्या फार मोठी होती. त्यांत २४ वें वर्ष पुरुषांस व २२ वें स्त्रियांस अत्यंत अनुकूल होतें असें दिसतें. दुसऱ्यांदा लग्न करणारांमध्यें पुरुषांचें संख्याधिक्य होतें. ह्यांची संख्या २५ हजार, ५३ होती. १९ हजार विधवांनीं दुसरें लग्न केलें. दोनतृतीयांश विधुरांनीं विधवांशीं विवाह केला; निम्म्या विधवांनीं विधुर पसंत केले. विधवांचे विवाहाचें सामान्य वय ३० ते ५० ह्या मर्यादेंत होतें. त्यांमध्यें ५४ वर्षांच्या वधूंचें संख्याधिक्य होतें. विधुरांमध्यें हें वय ५८ हें होतें. १८ व्या वर्षी दुसऱ्यांदा लग्न करणारा एक पुरुष आढळला. १९ व्या वर्षी पुनर्विवाह करणाऱ्या ३ विधवा होत्या. साठी उलटलेल्या विवाहबद्ध लोकांमध्यें विधुर व विधवा ह्यांचाच मोठा भरणा होता. पहिल्यांदाच विवाह करणाऱ्या वृद्ध वधूवरांच्या संख्येच्या तिप्पट त्यांची संख्या होती.

शिरगणतीचे अगदीं अलीकडचे आकडे पाहिले तर असें दिसून येतें कीं, विवाहित पुरुषांची संख्या ८४ लक्ष, ८९ हजार आणि विवाहित स्त्रिया ८६ लक्ष, ३ हजार होत्या असें त्यांत दर्शविलें आहे. ह्या दोन संख्यांमध्यें तफावत आहे, तिचें कारण काय? कांहीं पुरुष बहुपत्नीक आहेत कीं काय? ह्याचा खुलासा असा आहे कीं शिरगणतीचे वेळीं विवाहित स्त्रीची नोंद होते, पण व्यापार, नोकरी किंवा असल्याच दुसऱ्या निमित्तानें तिचा पती परदेशांत गेलेला असेल तर त्याची नोंद होत नाहीं. ह्यामुळें विवाहित पुरुषांपेक्षा विवाहित स्त्रिया अधिक आहेत असें दिसतें. उन्हाळ्यांत होणाऱ्या विवाहांची संख्या मोठी होती. त्याच्या खालीं पावसाळा आणि नाताळ येतात.

घटस्फोटांची संख्या पांच हजार होती. त्यांचे विवाहांशीं शेकडा १½ असें प्रमाण पडतें. १४४ लग्नें रद्द झालीं व बाकीच्या बाबतींत काडीमोड झाली. विवाहाच्या पहिल्याच वर्षांत ते मोडल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत. वीस वर्षें टिकून ५८२ विवाह मोडले. पतिपत्नी सुखानें नांदण्यास संततीचें सहाय होतें असा सामान्य समज आहे. पण घटस्फोटांबद्दल ४,६०६ अर्ज करण्यांत आले असतां, त्यांपैकीं दोन हजारांमध्यें अपत्य नव्हतें आणि अडीच हजार दंपत्यांस अपत्य होतें. १,४०८ दंपत्यांस म्हणजे बहुसंख्याकांस प्रत्येकीं एक मूल होतें; तेरांस प्रत्येकीं सहाचे वर मुलें होतीं. घटस्फोट झालेल्यांचीं दुसऱ्या स्त्री-पुरुषांशीं पुन्हा लग्नें होतात. ३,७५९ पुरुषांनीं व ३,२२९ स्त्रियांनीं एक विवाह अयशस्वी ठरल्यावर वैवाहिक जीवनाची दुसऱ्यांदा परीक्षा घेण्याचें वृत्तांताच्या वर्षी ठरवलें. घटस्फोट झालेल्या ४२१ पुरुषांनीं त्याच अवस्थेंतील स्त्रियांशीं विवाह केला.


'लग्न' म्हणतांच नाक मुरडणाऱ्या स्त्रियांना निसर्गाशीं लपंडाव खेळण्याइतकी शक्ति असते काय?




लपंडाव

नव्युग चित्रपट लि०चें पहिलेंच प्रभावी कलाचित्र!

भूमिका:
• मीनाक्षी • वनमाला, B.A., B.T.
• विनायक • बाबूराव पेंढारकर
• साळवी • पवार

अलोट गर्दीचा २ रा आठवडा

न्यू वेस्ट एण्ड मुंबई

रोज: ३, ७ व ९॥.
शनि-रवि जादा खेळ १॥ वा.

लपंडावमधलि गाणीं H.M.V. रेकॉर्डस्वर येत.
प्रकाशक: फिअरलेस पिक्चर्स मुंबई ४

# स्फुट विचार

## युरोपच्या व्यापाराची नाकेबंदी

पश्चिम युरोपांतील बहुतेक देश जर्मनीच्या कक्षेंत गेल्यामुळें शत्रूस युद्धोपयोगी सामुग्री पोहोचूं नये म्हणून इंग्लंडनें चालू केलेल्या व्यापाराच्या नाकेबंदीचें स्वरूप पालटलें आहे. युरोपांतील तटस्थ राष्ट्रांची संख्या संपुष्टांत आली आहे, परंतु नाकेबंदी अभेद्य होण्याचें कामीं फ्रान्सचें सहाय आतां इंग्लंडला मिळेनासें झालें आहे. भूमध्य समुद्रांतून इटलीच्यामार्फत जर्मनीस माल मिळत असे, त्यावर टेहळणी करणारीं फ्रेंच जहाजें नजर ठेवीत असत. जर्मन सरहद्द स्पेनला भिडल्याकारणानें ह्या देशांतून राकेल तेलासारखा माल जर्मनींत जाऊं नये अशी व्यवस्था करणें इंग्लंडला प्राप्त झालें आहे. पादाक्रांत केलेल्या बेल्जम, फ्रान्स वगैरे देशांतून कांहीं मालाचा पुरवठा जर्मनीस होत असला तरी स्वतः ह्या देशांस त्यांस आवश्यक असलेला माल बाहेरून मिळणें ब्रिटिश नाकेबंदीमुळें अशक्य झालें आहे. तेव्हां त्यामध्यें अंशभागी होण्याची जर्मनीस आशा नाहीं. अटलांटिक महासागरावरून युरोपांत जावयाच्या मालाची कडक तपासणी करण्याचें ब्रिटिश सरकारानें ठरवलें असल्याचें सर ह्यू डाल्टन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें. बेल्जम व फ्रान्स ह्या देशांचा पश्चिम किनारा व त्यावरील बंदरें जर्मनीच्या हातीं गेल्यानें व्यापाराची हिटलरची सोय झाली असें वाटण्यास कारण नाहीं. पश्चिमेकडील समुद्रांत जहाजें बुडवण्याचा प्रयत्न जर्मनीनें चालवला आहे आणि ब्रिटिश व्यापारास व्यत्यय आणण्याची त्याची खटपट आहे. तथापि, समुद्रावर ब्रिटिश आरमाराचें सामर्थ्य प्रभावी असल्याकारणानें ह्या प्रयत्नांस यश येणें अशक्य आहे. उलट, युरोपिअन व्यापाराच्या नाकेबंदीचें ब्रिटिशांचें जाळें अधिक विस्तृत व कार्यक्षम केलें जात आहे. स्पेनसारख्या तटस्थ राष्ट्रांच्या मामुली गरजा भागतील अशी सवलत ह्या नाकेबंदींत दिली जाईल पण कोणत्याहि युरोपिअन देशाच्या आयात किंवा निर्गत व्यापाराचा फायदा जर्मनीस मिळणार नाहीं असा कडेकोट बंदोबस्त करण्याचें धोरण इंग्लंडनें स्वीकारलें आहे. व्यापाराच्या परवान्यांची पद्धति ह्यापुढें कडक रीतीनें अंमलांत आणली जाईल अशी घोषणा इंग्लंडनें केली आहे.

---

## अमेरिका खंड सावध झालें

लहान-मोठ्या स्वतंत्र देशांतील लोकांत फूट पाडणें; तेथें नात्सी मतांचा प्रचार करणें आणि शेवटीं अंतस्थ गडबड माजवून आपले हातपाय त्यांमध्यें पसरणें हा जर्मनीचा क्रम युरोपांत यशस्वी झालेला आहे. परंतु हिटलरची महत्त्वाकांक्षा युरोपासच मर्यादित न रहातां ती दुसऱ्या खंडांमध्येंहि पसरण्याची भीति आहे ती निराधार नाहीं. ह्या खंडांत इंग्लंडविषयीं गैरसमज पसरवून त्यांमधील लोकांची सहानुभूति आपल्या बाजूस ओढून घेण्याची युक्ती जर्मनी लढवीत आहे. तथापि, युरोपिअन राष्ट्रांच्या अनुभवानें बाहेरील देश शहाणे झाले आहेत आणि जर्मनीच्या कारवायांस प्रतिबंध करीत आहेत. ह्याचें ठळक उदाहरण अमेरिकेचें आहे. युरोपियन राष्ट्रांच्या वसाहती अमेरिकन खंडांत आहेत. त्यांच्या आश्रयानें जर्मनी अमेरिका खंडांतील देशांत गडबड करण्याची भीति आहे. ती नाहींशी व्हावी म्हणून हवाना येथें अमेरिकेंतील प्रजासत्ताक राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद् भरून तीमध्यें त्यांनीं स्वसंरक्षणाच्या प्रश्नाची चर्चा केली आणि त्या बाबतींत एक योजना आखली. युरोपिअन राष्ट्रांचें बोट अमेरिकन राजकारणांत न शिरूं देणें हा या योजनेचा मुख्य हेतु आहे. वसाहतींच्या निमित्तानें आपली सत्ता युरोपिअन राष्ट्रें अमेरिका खंडांत पसरवूं लागलीं तर त्यांस प्रतिबंध केला जाईल. अमेरिका युरोपिअन भानगडींपासून दूर राहील. अमेरिकन राष्ट्रांस युरोपांत राजकीय सत्ता मिळवण्याचा अभिलाष नाहीं; पण स्वतःच्या स्वातंत्र्यास धोका आणणारी कोणतीहि चळवळ तीं चालूं देणार नाहींत. संयुक्त अमेरिकन राष्ट्राच्या सहानुभूतीचा ओढा इंग्लंडकडे आहे हें स्पष्ट आहे. स्वातंत्र्य व लोकशाही ह्यांचें जगांत संरक्षण होण्यास हिटलरशाहीचा पाडाव होण्याची आवश्यकता त्यास मान्य आहे. लढाऊ सामुग्रीचें सहाय अमेरिका इंग्लंडला उघड रीतीनें देत आहे. परंतु त्याच्या पलीकडे जाऊन युरोपिअन युद्धांत प्रत्यक्ष पडण्याची त्यास आवश्यकता नाहीं आणि त्या प्रकारचें अमेरिकेचें धोरणहि नाहीं. अमेरिकन खंडाचें संरक्षण हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न त्यांतील राष्ट्रांपुढें आहे आणि तीं तो सोडवीत आहेत. युरोपिअन युद्धास पुढें चळण मिळेल त्यावर सदरहु धोरणाचें भवितव्य अवलंबून आहे.

---

## बिनव्याजी सरकारी कर्जें

युद्धकाळांत सरकाराला पैसा खर्चास हवा असतो तो कर व कर्जें ह्या दोन मुख्य मार्गांनीं त्यास मिळवावा लागतो. व्याजाचा बोजा विशेष न होतां जरूर असलेल्या रकमा वेळच्या वेळीं आपल्या हातीं याव्या अशी त्यांची स्वाभाविक इच्छा असते. जनतेमधील निरनिराळ्या वर्गांच्या भिन्नभिन्न सांपत्तिक परिस्थितीस जुळतील अशा वर्गांच्या योजना अंमलांत आणल्या गेल्या असतां लोकांस व सरकारास तें सोयीचें होतें. कर्जाऊ द्यावयाच्या रकमांवरील व्याजाकडे बहुतेक लोकांचें लक्ष असतें आणि तें योग्यहि आहे. पण समाजांतील कांहीं व्यक्तींस आपला पैसा बिनव्याजी पण सुरक्षित रीतीनें सरकारकडे ठेवण्याची सवड असते. आपल्या पैशाची निश्चिति आणि राष्ट्रासाठी युद्धसेवा हा त्यांचा दुहेरी उद्देश बिनव्याजी कर्ज सरकारास दिल्यानें सफल होतो. प्रस्तुत युद्धांत ह्या तऱ्हेच्या कर्जांचा बराच विस्तार होत आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्या बाबतींत केलेला उपक्रम यशस्वी ठरत आहे. ग्रेटब्रिटनमधील तेथील फडनवीसांनीं बिनव्याजी युद्धकर्जाची योजना नुकतीच जाहीर केली आहे. कोणाहि व्यक्तीस किंवा कंपनीस आपला पैसा तिजोरीकडे देऊन पावती घेऊन जातां येईल. युद्ध संपून शांततेचा तह झाल्यावर तीन महिन्यांनीं पावती किंवा सर्टिफिकेट सरकारास दाखवून कर्जदारास आपली बिनव्याजी कर्जाची रकम परत घेण्याचा हक्क ह्या योजनेस अनुसरून राहील. शंभर पौंडांहून कमी रकम देऊं करणारांनीं ती पोस्ट ऑफिसमध्यें भरावी आणि तीवरील व्याज सरकारी तिजोरींत जमा करण्यास सांगावें अशीहि तरतूद करण्यांत आली आहे. युद्धकाळ आणि पुढें तीन महिने ही मुदत जरा लांब आहे, ती कमी करण्यांत आली असतां कांहीं व्यक्तींच्या व कंपन्यांच्या मोठ्या रकमा तिजोरीस बिनव्याजी मिळण्याचा संभव आहे अशी सूचना पुढें आली आहे. तिचा विचार ब्रिटिश फडनवीस करतील अशी अपेक्षा आहे.

---

### शुगर सिंडिकेटचें शिष्टमंडळ

उत्तर हिंदुस्थानांतील साखरेच्या कारखानदारांच्या मध्यवर्ती संस्थेची ('इंडियन शुगर सिंडिकेट') मान्यता संयुक्त प्रांताच्या सरकारनें नुकतीच काढून घेतली. साखरेची विक्री व तिचे बाजारभाव ह्यांचें नियंत्रण करता यावें म्हणून सिंडिकेट अस्तित्वांत आली आणि तिनें सरकारची मान्यता मिळवली. ह्या मान्यतेबरोबर कांहीं नियंत्रणें अर्थातच आलीं. उसाच्या किंमती शेतकऱ्यांस कोणत्या दरानें देण्यांत याव्या हें ठरवण्याचा अधिकार सरकाराकडे आला. साखरेच्या बाजारभावांविषयींचें सिंडिकेटचें धोरण सरकारास पसंत पडेनासें होऊन त्यांचे दरम्यान मतभेद उत्पन्न झाले. ह्याचा परिणाम सिंडिकेटची सरकारी मान्यता काढून घेण्यांत झाला. सिंडिकेटचें कारखानदारांचें सभासदत्व सक्तीचें होतें, तें त्यामुळें त्यांच्या खुषीचें झालें. साखरेची विक्री व तिचे बाजारभाव ह्यांचे बाबतींत सिंडिकेटचें नियंत्रण दूर होऊन कारखानदारांमध्यें अनिष्ट चढाओढ चालू झाली आणि बाजारभावांत अस्थिरता निर्माण झाली. सिंडिकेटच्या शिष्टमंडळानें संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरांची मुलाखत घेऊन त्यांच्या पुढें ही परिस्थिति मांडली आणि सरकारी मान्यता काढून घेण्याविषयींचा हुकूम रद्द केला जावा अशी त्यांस विनंति केली. साखरेचे बाजारभाव, तिचें उत्पादन व सट्टे ह्यांचें नियंत्रण डिफेन्स ऑफ इंडिया कायद्याच्या खालीं संयुक्त प्रांत व बहार येथील सरकारांनीं करण्याचें अगत्यहि शिष्टमंडळानें प्रतिपादिलें. साखरेवरील पट्टी एक रुपयानें कमी व्हावी म्हणजे सिंडिकेटला आपला माल स्वस्त दरानें काढून टाकतां येईल अशी सूचना त्यानें केली असून संयुक्त प्रांताचें सरकार सिंडिकेटच्या मान्यतेबद्दलचा आपला हुकूम रद्द करील अशी अपेक्षा होती.

### शुगर सिंडिकेटला पुन्हा मान्यता मिळाली

इंडियन शुगर सिंडिकेटनें पूर्वी स्वतः दिलेल्या अभिवचनांस हरताळ फासून साखरेचे भाव एकाएकीं दोन रुपये मणानें उतरवले ह्या गोष्टीचा साखरेच्या व्यापाऱ्यांनीं निषेध केला असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. बाजारभावांच्या स्थिरतेवर विसंबून व्यापाऱ्यांनीं सवदे केले होते, त्यांस नुकसानींत यावें लागलें आहे. शुगर सिंडिकेटला अखेर मध्यप्रांतांतल्या सरकारास विनंति करून स्वतःची मान्यता परत मिळवावी लागली आहे. सरकारी मान्यता काढून घेतली गेल्यानें संयुक्तप्रांत व बिहार येथील साखरेच्या धंद्यांत गोंधळ माजून गेला होता. उसाच्या लागवडीचें क्षेत्र, त्याच्या शेतकऱ्यांस मिळावयाच्या किंमती, साखरेची विक्री व तिचे बाजारभाव ह्यांवरचें नियंत्रण दूर झाल्यानें उत्पन्न झालेल्या परिस्थितीवर उपाय योजण्याची आवश्यकता सर्वांस पटली होती आणि कारखानदार व सरकार ह्यांचे दरम्यान वाटाघाटी चालल्या होत्या. ह्या चर्चेचा आतां निकाल लागलेला आहे आणि शुगर सिंडिकेटला सरकारी मान्यता पुन्हां प्राप्त झाली आहे. तिच्या बरोबर सरकारनें घातलेले निर्बंध स्पष्ट व तपशीलवार स्वरूपांत सिंडिकेटला मान्य करावे लागले आहेत. सिंडिकेटच्या अध्यक्षाची निवडणूक सरकारच्या मान्यतेनें व्हावयाची आहे, साखरेच्या भावांचें नियंत्रण होणार आहे आणि उसाच्या लागवडीचें क्षेत्र मर्यादित होणार आहे. चालूच्या हंगामांतली शिलकी साखर पुढच्या हंगामांत विकावी लागणार असल्या कारणानें येत्या हंगामांत साखरेच्या किंमती चढणें संभवनीय नाहीं आणि उसाचें व साखरेचें उत्पादन मर्यादित व्हावें लागेल. हिंदी साखरेच्या धंद्यास स्थैर्य व संघटित स्वरूप मिळून त्याची योग्य जोपासना होणें अगत्याचें आहे. सट्टेबाजी, बाजारभावांत हेलकावे व उत्पादनाच्या प्रमाणांत चलबिचल ह्या गोष्टी ह्या धंद्यास प्रतिकूल आहेत हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

### डॉलर-रुपया हुंडणावळ

ब्रिटिश सरकारानें अमेरिकन हुंडणावळीचा (स्टर्लिंग-डॉलर) दर निश्चित व स्थिर केला आहे आणि त्या दरानें व्यापारी व्यवहारांत निघणारीं देणीं-घेणीं भागवलीं जात आहेत. पण अमेरिकेच्या हुंडी बाजारांत ह्याशिवाय दुसराहि दर प्रचलित आहे आणि त्या दरानें कांहीं व्यवहार केले जात आहेत. ब्रिटन-अमेरिका हुंडणावळीच्या ह्या दोन भिन्नभिन्न दरांचें गौडबंगाल कोठें आम्हीं "अर्थ"मध्यें मागें उकलून दाखवलें आहे. हिंदुस्थानचा अमेरिकेशीं निर्गत व्यापार चालतो, त्यांतलें आमचें येणें आम्हांस ब्रिटिश सरकारानें स्थिर केलेल्या स्टर्लिंग-डॉलर हुंडणावळीच्या दरानें मिळतें. पण दुसरा दर प्रचलित आहे तो हिंदुस्थानच्या निर्गत व्यापारास अधिक फायदेशीर आहे. कारण, त्या दरानें आमचें येणें आकारलें असतां हिंदुस्थानास मिळावयाच्या डॉलर्सचे अधिक रुपये होतात आणि तेवढी रकम हिंदी व्यापारी व शेतकरी वर्ग ह्यांच्या पदरांत पडते. ह्या दरानें हिंदी निर्गतीचे पैसे अमेरिकेंत होणाऱ्या व्यापारांत आम्हांस मिळावे अशी मागणी सरकाराकडे फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्सच्या कार्यकारी मंडळानें केली आहे, तिचें रहस्य वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. मंडळानें दुसरी एक सूचना केली आहे ती हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या सोन्याचे बाबतींत आहे. युद्धकाळांत राष्ट्रीय चलनाचा पाया शक्य तितका भक्कम करण्याचें महत्त्व काय आहे हें निराळें सांगितलें पाहिजे असें नाहीं. तेव्हां, हिंदी सोनें देशांतल्या देशांत राहूं द्यावें आणि चलनी नोटांस आधार म्हणून ठेवावयाचा सोन्याचा निधि भक्कम करावा ही फेडरेशनची सूचना योग्य आहे ह्यांत शंका नाहीं. चलनी नोटांच्या तारणांत सोनें, चांदी, आणि विलायती व हिंदी कर्जरोखे असतात, त्यामध्यें धातूंचें प्रमाण मोठें रहावें असें म्हणण्याचा उद्देश उघड आहे आणि त्याचा योग्य विचार सरकारनें केला पाहिजे. चलनाचा पाया बळकट करण्याचा प्रत्येक उपाय योजणें इष्ट आहे ह्याविषयीं मतभेद होण्याचें कारण नाहीं.

---

### हिंदुस्थानचीं बंदरें सुरक्षित आहेत

ब्रिटिश व हिंदी आरमारानें हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचें मार्ग सुरक्षित राखले आहेत. गेल्या जून महिन्यांत पूर्वीच्या सालापेक्षां अधिक व्यापारी जहाजें हिंदी बंदरांमध्यें येऊन गेलीं. जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यांतले आंकडे ह्याच गोष्टीची साक्ष देत आहेत.

### कॅनडामधील युद्ध-सामुग्रीचे कारखाने

युद्ध सामुग्री तयार करण्याच्या कारखान्यांत सुमारें १०० कोटी रुपयांचें भांडवल घालण्यांत आलें आहे.

### पॉवर ऑल्कोहोलच्या उत्पादनास उत्तेजन

संयुक्त प्रांताच्या विधिमंडळानें पॉवर ऑल्कोहोलच्या उत्पादनास उत्तेजन देण्यासाठीं केलेल्या कायद्यास तेथील गव्हर्नरांची संमति मिळून तो प्रांतिक गॅझेटांत आतां प्रसिद्ध झाला आहे.

# अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ

## पुणें येथील हातानें कागद बनविण्याचें संशोधन-केंद्र

( वरील केंद्राचें काम ता. १० जुलै रोजीं सुरू झालें, त्यावेळीं पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं केंद्रास भेट देऊन त्यास त्यांचें कार्यांत यश चिंतिलें. पंडितजींनीं आपल्या भाषणांत संशोधनाचें व शास्त्रशुद्ध चौकशीचें महत्त्व प्रतिपादन केलें. ह्या केंद्राच्या स्थापनेचा इतिहास व त्यांत होणाऱ्या कार्याची रूपरेषा खालीं थोडक्यांत देण्यांत येत आहे. हातानें कागद तयार करण्याच्या धंद्याचे पुनरुज्जीवनासाठीं श्री. वैकुंठराय मेहता आज अनेक वर्षे प्रयत्न करीत आहेत, त्यांचेंच पुणें येथील केंद्राची चांगल्या मजबूत पायावर स्थापना हें फळ आहे. )

### जुना धंदा का बुडाला ?

हातानें कागद तयार करण्याचा धंदा हा हिंदुस्थानांतील धंद्यांपैकी एक अत्यंत जुना असा आहे. मुंबई प्रांतांत कांहीं ठिकाणीं विशेषतः एरंडोल व जुन्नर येथें तो अद्यापहि चालू आहे. मोगलांच्या आणि पेशव्यांच्या अमदानींत तो अहमदाबाद, अंकलेश्वर, खेडा, सुरत, ठाणें, महाड, नाशिक, एरंडोल, जुन्नर, सातारा, वाई, कराड, बेळगांव, गोकाक, कोल्हापूर इत्यादि अनेक ठिकाणीं चालू होता. विदेशी गिरण्यांत तयार झालेला कागद स्वस्त मिळूं लागल्यामुळें आणि सरकारहि विदेशी कागद घेऊं लागल्यामुळें हा धंदा पुढें मंदावला. सावकार व व्यापारी आपल्या हिशेबाच्या वह्यांसाठीं जुन्नरी आणि अहमदाबादी कागद अद्याप वापरतात, म्हणून हातानें कागद तयार करण्याचा धंदा जीव धरून राहूं शकला; नाहीं तर तो नामशेषच झाला असता. ह्या धंद्याचें पुनरुज्जीवन करणें हा अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाच्या कार्यापैकीं एक भाग आहे. कागद करणाऱ्या लोकांस संघाच्या मार्फत सहाय करण्याचा सरकारनें गेलीं कांहीं वर्षे प्रयत्न चालविला आहे. ह्या धंद्याचें परीक्षण केलें असतां असें आढळलें कीं, जुन्या कारखान्यांस मदत करावयाची झाल्यास ती विशिष्ट धोरणानेंच केली पाहिजे. कागद करणारे आपलें पूर्वीचें कसब विसरून गेले आहेत आणि ते आज तयार करीत असलेला माल लोकांस पसंत पडण्याजोगा नसतो.

### धंद्यास वाव

हिंदुस्थानांत सध्या दरसाल दर माणशीं १½ ते २ पौंड इतका कागद लागतो. साक्षरतेचें प्रमाण १०% सुद्धा नाहीं, हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. साक्षरताप्रसार व व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांच्या वाढीबरोबर कागदासहि अधिक मागणी येऊं लागेल हें उघड आहे. ह्या दृष्टीनें कागदाच्या धंद्याच्या वाढीस हिंदुस्थानांत मुबलक वाव आहे. खेडेगांवांतून वाया जाणाऱ्या अनेक गोष्टींपासून आणि झाडांच्या तंतूंपासून कागद तयार करतां येणें शक्य आहे. हातानें तयार केलेल्या, चांगल्या दर्जाच्या कागदास मागणी आहे. शेअर सर्टिफिकिटें, विमा पॉलिसी, दस्तऐवज, फिल्टर पेपर, ड्रॉइंग व आर्ट पेपर, टिपकागद, इत्यादींसाठी त्याचा उपयोग होतो. सरकारी खातीं आणि मोठ्या कंपन्या ह्यांचेकडे असा कागद खपण्यास हरकत नाहीं.

### केंद्राची योजना

सुमारें दोन वर्षांपूर्वी सरकारास एक योजना सादर करण्यांत आली होती, ती १९३९-४० च्या अंदाजपत्रकांत मान्य होऊन त्याप्रमाणें भांडवली खर्चासाठीं १४,००० रुपये व वार्षिक खर्चासाठीं १०,१४० रुपये सरकारनें मंजूर करून हातानें कागद तयार करणारें, त्याचें प्रात्यक्षिक दाखविणारें व त्याबाबत संशोधन करणारें एक केंद्र उघडण्यास मान्यता दिली. हें केंद्र जुन्नर येथें असावें, अशी मूळ योजना होती, परंतु पुणें हें अधिक मध्यवर्ती, संशोधनास सोई उपलब्ध असणारें व लोकांच्या दृष्टीनें सोईचें असल्यानें, पुणें येथें तें आणण्यास सरकारनें संमति दिली व गणेशखिंड रस्त्याजवळ, शेतकी कॉलेजाचे हद्दीवर ग्रामोद्योग संघास एक जागाहि दिली.

### इमारत

पुणें येथें इमारत बांधावयाची व तीहि युद्धपरिस्थितींत, त्यामुळें बांधकामास अधिक खर्च येईल; तेव्हां सरकारनें भांडवली खर्चासाठीं आणखी ७,५०० रुपये ग्रँट द्यावी, अशी सरकारास विनंति करण्यांत आली, ती त्यांनीं मान्य केली.

इमारतीच्या बांधकामास जानेवारी, १९४० च्या पहिल्या आठवड्यांत प्रारंभ झाला. बांधकामाचें कंत्राट मेसर्स रानडे ब्रदर्स ह्यांस देण्यांत आलें होतें. संघाचे ऑनररी आर्किटेक्ट, श्री. बी. डी. म्हात्रे, ह्यांच्या नकाशाबरहुकूम काम करण्यांत आलें आहे. संघाचे ऑनररी केमिस्ट श्री. के. बी. जोशी, ह्यांनीं पुणें केंद्राची सर्व योजना आखलेली असून तेच केंद्राची व्यवस्था पहात आहेत.

### केंद्राचे उद्देश

हें केंद्र स्थापण्याचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणें आहेतः—

( १ ) योग्य अशी नवीन यंत्रसामुग्री योजून अगर जुन्यांत सुधारणा करून, उत्पादन सुधारण्याचा यत्न करणें. अ. भा. ग्रा. संघाच्या उद्देशास धरूनच शक्य ती सुधारणा केली जाईल.

( २ ) जुन्या कारागिरांना अधिक चांगला कागद करण्यास शिकवणें. नवीन यंत्रसामुग्रीनें त्यांस न भेडसावतां हें साधणें.

( ३ ) सहज उपलब्ध होतील अशा जिनसांपासून कागद बनविणें.

( ४ ) कागद बनविण्याची कला विद्यार्थ्यांस शिकविणें.

( ५ ) शाळा, खेडेगांव व एका शेतकऱ्याची झोपडी, ह्यांत कागद बनवितां येईल असा कार्यक्षम संच तयार करणें.

चिंध्या व सूर्यफूल, अळू, केळ्यांचे खुंट, एरंडी, इत्यादींच्या तंतूंपासून कागद किफायतशीर रीतीनें कसा करतां येईल, ह्याची चौकशी १९४०-४१ मध्यें प्रथम हातीं घेण्यांत येईल. कागदाच्या वेगवेगळ्या तऱ्हा तयार करण्याचाहि प्रयत्न केला जाईल व वरती निर्दिष्ट केलेल्या गर्तांतून कागदाचें उत्पादन कसें वाढवून आणतां येईल ह्याचेंहि संशोधन हातीं घेण्यांत येईल. उमेदवार तयार करण्यास इतक्यांत प्रारंभ केला जाणार नाहीं.

## हिंदी रिझर्व्ह बँक

### हिशेबाचें वर्ष बदललें

रिझर्व्ह बँकेच्या हिशेबाचें वर्ष जानेवारी ते डिसेंबर असें होतें, तें आतां जुलै ते जून असें करण्यांत आलें आहे. डिसेंबर, १९३९ अखेर वर्ष संपल्यानंतर ३० जून, १९४० अखेर हिशेब पुरे करण्यांत आले आहेत आणि ह्यापुढें दर बारा महिन्यांनीं हिशेब पुरे केले जातील.

### नफा व डिव्हिडंड

ह्या सहामाहींत बँकेस निवळ नफा २९$\frac{1}{2}$ लक्ष रुपये झाला. भागीदारांस १$\frac{1}{2}$% क्युम्युलेटिव्ह दरानें डिव्हिडंड देण्यास ८$\frac{3}{4}$ लक्ष रुपये लागले आणि उरलेले २०$\frac{1}{2}$ लक्ष रुपये गव्हर्नर जनरल इन् कौन्सिलला दिले.

### रिझर्व्ह बँकेच्या नोटा

युद्धपरिस्थितीमुळें व्यापार व उद्योगधंदे ह्यांस तेजी आली आणि चलनास मागणी वाढली. जून १९३९ अखेर १८४$\frac{3}{4}$ कोटि रुपयांच्या नोटा प्रसृत होत्या; जून १९४० अखेर तो आकडा २४७$\frac{1}{2}$ कोटींवर गेला.

### प्रांतिक सरकारांचीं ट्रेझरी बिलें

१९४० च्या पहिल्या सहामाहींत प्रांतिक सरकारांनीं ट्रेझरी बिलांचे स्वरूपांत उभारलेल्या कर्जांची वर्गवारी खालीं दिली आहेः—

| | कोणत्या सरकारचें | मुदत | रकम (लक्ष रु.) | व्याजाचा सरासरीं दर |
|---|---|---|---|---|
| | | | | रु. आ. पै |
| १२ जाने. | आसाम | ३ महिने | ५० | २—८—० |
| २६ जाने. | संयुक्तप्रांत | ” | ६० | २—७—९ |
| २ फेब्रु. | मध्यप्रांत | ” | ४० | २—४—११ |
| ८ मार्च | बंगाल | ” | ३० | २—१—९ |
| १२ एप्रिल | आसाम | ” | २५ | १—१५—० |

म्हणजे चार प्रांतिक सरकारांनीं मिळून २ कोटि, ५ लक्ष रुपयांचीं ट्रेझरी बिलें ह्या मुदतींत विकलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर. द. सा. द. शे. २ रु. ५ आ. ३ पै पडला.

### शेड्यूल्ड बँका

बँकांस शेड्यूलमध्यें दाखल करतांना त्यांचें भरणा झालेलें भांडवल व रिझर्व्ह ह्या शब्दसमुच्चयाचा अर्थ त्यांची खरी म्हणजे बाजारांत मिळणारी किंमत असा करावा, असें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें. बँकांच्या ताळेबंदांतील आकडे न घेतां भांडवलाची व रिझर्व्हची किंमत करून, बँकांस शेड्यूल्ड बँकांचे यादींत घ्यावयाचें किंवा नाहीं हें ह्यापुढें ठरविण्यांत येईल.

### शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति

(आकडे कोटि रुपयांचे आहेत)

| | ३०-६-३९ | २९-१२-३९ | २८-६-४० |
|---|---|---|---|
| एकूण देणीं | २५१ | २४० | २५१ |
| रोकड | ८$\frac{1}{2}$ | १० | ११ |
| रिझर्व्ह बँकेकडे ठेवी | १७ | २६$\frac{1}{2}$ | २०$\frac{1}{2}$ |
| दिलेलीं कर्जें | १४१ | ११५$\frac{1}{2}$ | १४०$\frac{1}{2}$ |
| डिस्कौंट केलेल्या हुंड्या | ४$\frac{1}{2}$ | ६$\frac{1}{2}$ | ५ |

मे आणि जून महिन्यांत शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी अनुक्रमें ५$\frac{1}{2}$ व ५$\frac{1}{4}$ कोटि रुपयांनीं कमी झाल्या व त्या प्रमाणांत त्यांचीं देणीं कमी झालीं. एकंदरीनें, शेड्यूल्ड बँकांना पैसे परत देण्यास अडचण भासली नाहीं. कांहीं शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे मदत मागितली, आणि योग्य ती मदत त्यांस देण्यांत आली. बिगर-शेड्यूल्ड बँकांची परिस्थितिहि समाधानकारक राहिली.

### नफा तोटा पत्रक

रिझर्व्ह बँकेस व्याज, डिस्कौंट, हुंडणावळ, कमिशन, इत्यादींचे मार्गानें ८३ कोटि, ९० लक्ष रुपये मिळाले. खर्चाच्या प्रमुख बाबी येणेंप्रमाणें होत्याः—

| | रुपये |
|---|---|
| नोकरांचा पगार | १७ लक्ष, ८० हजार |
| डायरेक्टर व लो. बोर्ड मेंबरांचा भत्ता | ५२ हजार |
| ऑडिटर्स फीज् | १२ हजार |
| कर, भाडें, विमा, दिवाबत्ती | २ लक्ष, ६६ हजार |
| स्टेशनरी | ५६ हजार |
| चेक, नोटा, इत्यादींची छपाई | ९ लक्ष |
| एजन्सीबद्दल दिलेले पैसे | १२ लक्ष, ८० हजार |

बँकेच्या रिझर्व्ह फंडांत ५ कोटि रुपये आहेत.

---

## चतुःशृंगी को. के. सोसायटी, लि., पुणें

(वार्षिक सभा : २५–८–४०)

ह्या सोसायटीचे पटावर २२४ सभासद असून त्यांचें भरणा झालेलें भांडवल ५,७०१ रुपये आहे. सभासदांच्या ठेवी ६,८५७ रुपयांच्या व बिगर सभासदांच्या ठेवी १,९४५ रुपयांच्या आहेत. सोसायटीचा रिझर्व्ह फंड ४$\frac{1}{2}$ हजारांवर आहे. वर्षअखेर सोसायटीस ६४४ रु. १२ आ. ३ पै नफा झाला, त्यांतून २७३ रु. १५ आ. ३ पै एवढ्या रकमेचा डिव्हिडंड देण्याकडे विनियोग करावा, अशी व्यवस्थापक मंडळाची शिफारस आहे. २७-८-३९ रोजीं सोसायटीचे माजी चेअरमन, कै. केशवराव बाळ ह्यांच्या तैलचित्राच्या उद्‌घाटनाचा समारंभ झाला. कै. वामनराव पटवर्धन, माजी चेअरमन, यांचें नांव सोसायटीच्या लायब्ररीस देण्याचा समारंभ ता. ४–३–४० रोजीं झाला. सोसायटीचें काम गेल्या वर्षी श्री. वि. अ. पटवर्धन ह्यांचे नेतृत्वाखालीं आतांपर्यंतच्या पद्धतीप्रमाणें चांगल्या तऱ्हेनें पार पडलें.

---

## चिटें मर्चंट्स को. बँक लि.

(वार्षिक सभा : २१–८–४०)

वरील बँकेचे पटावर १२५ सभासद असून तिचें भरणा झालेलें भांडवल ५,७०० रुपये आहे. बँकेकडे एकूण २५,०९७ रुपयांच्या ठेवी आहेत. डीज फंडांत २५४ रुपये रिझर्व्ह फंडांत २८१ रुपये व डिव्हिडंड ई. फंडांत १७० रुपये आहेत. बँकेनें ६,१७४ रुपये सरकारी कर्जरोख्यांत व मुं. प्रां. सहकारी बँकेच्या भागांत गुंतविले आहेत, त्यांची तपशीलवार माहिती (दर्शनी किंमत, पडलेली किंमत, ताळेबंदाच्या दिवशीं किंमत इ.) दिली असती तर बरें झालें असतें. बँकेस २५,१२२ रुपये कर्जे येणें आहे. अहवालाचे सालीं सभासदांकडे थकबाकी मुळींच नाहीं, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. बँकेची सालोसाल प्रगति होत आहे. वर्ष अखेर बँकेस ८११ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ६$\frac{1}{4}$% डिव्हिडंड द्यावें, अशी मॅनेजिंग कमिटीची शिफारस आहे.

## गेल्या वर्षांतील औद्योगिक उत्पादन

३१ मार्च, १९४० अखेर संपलेलें वर्ष हिंदुस्थानांतील औद्योगिक उत्पादनाचे दृष्टीनें फार चांगलें गेलें. युद्ध परिस्थितीमुळें परदेशांतून मागणी वाढली व आयात व्यापार कमी झाला, त्यामुळें अंतर्गत उत्पादनास उत्तेजन मिळालें. विजेचा कारखान्यांतील खप १०% वाढला, हें त्याचेंच निदर्शक आहे.

### लोखंड व पोलाद

लोखंडी आणि पोलादी मालास सरकारी मोठी मागणी होती. संरक्षित लोखंडी व पोलादी विदेशी मालाची आयात उतरली परंतु हिंदी मालाची निर्गत २५% वाढली. मालास किंमतहि चांगली आली. चालू वर्षी उत्पादन आणखी वाढेल, अशी अपेक्षा आहे. टाटा कंपनी नवी यंत्रसामुग्री बसवीत आहे, त्याचे सहायानें चाकें, धांवा, तुंबे, हे तयार करतां येऊन लवकरच इंजनें व वॅगन्स ह्यांचेंहि उत्पादन करतां येण्याजोगी तयारी होईल.

### रासायनिक कारखाने

रासायनिक उत्पादनहि मोठ्या प्रमाणावर झालें. वर्षाचे उत्तरार्धांत अनेक नवीन कारखान्यांचें बांधकाम चालू होतें, त्यांतून चालू वर्षी माल निघूं शकेल.

| | सल्फ्यूरिक ॲसिड | सल्फेट ऑफ अमोनिया | पेट्रोल |
|---|---|---|---|
| | (टन) | (टन) | |
| १९३८–३९ | ५,०५,७०० | १४,८६० | १,९७,६५,२७९ |
| १९३९–४० | ५,९८,३६० | १९,८२४ | २,१०,००,००० |

**कोळशाचें उत्पादन व निर्गत**

| | उत्पादन (टन) | निर्गत (टन) |
|---|---|---|
| १९३८ | २४,०८,१५,००० | १०,०५,१०० |
| १९३९ | ३२,५०,५६,००० | २०,१०,२०० |

### चहा

३१ मार्च अखेर संपलेल्या वर्षी हिंदी चहाच्या मळ्यांतून ३८ कोटि, ४२ लक्ष पौंड चहा तोडण्यांत आला. गेल्या दहा वर्षांत इतका चहा निघाला नव्हता. ह्या उत्पादनापैकीं ३५ कोटि, ८० लक्ष पौंड चहा निर्गत झाला आणि २ कोटि, ८२ लक्ष पौंड चहा देशांत राहिला.

### ताग

तागाचा धंदा अत्यंत वाईट परिस्थितींत होता, त्यास युद्धानें हात दिला. सप्टेंबरमध्यें ९१ हजार टन उत्पादन झालें होतें; मार्चमध्यें हा आकडा १½ लक्ष टनांवर गेला. अर्थात्, तयार मालाची निर्गतहि मोठ्या प्रमाणावर झाली.

### कागद

कागदाची आयात अपुरी पडूं लागल्यामुळें देशी कागदास मागणी वाढली आणि ह्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी कागद तयार करण्याकरितां सहा नवीन कंपन्या निघाल्या. एका वर्षाचे अवधींत कागदाचें उत्पादन २३% वाढून तें १९३९-४० मध्यें १३ लक्ष, ८८ हजार हंड्रेडवेट झालें.

### कपास कापड

हा धंदा मात्र अपेक्षेप्रमाणें सुधारला नाहीं. त्यासंबंधीं माहिती आजच्या अंकांत दुसरीकडे दिलेली आहे.

## गिरणीमालक संघाचा अहवाल

### (१९३९)

### कापडाच्या धंद्यास चालू वर्ष बरें जाणार ?

"युद्ध चालू झालें नसतें तर १९३९ हें वर्ष हिंदी कपास कापडाच्या धंद्यास अतिशयच वाईट गेलें असतें. सप्टेंबरच्या प्रारंभीं लढाईस प्रारंभ झाला, तरी ह्या धंद्यास त्यापासून वर्ष संपण्यापूर्वी विशेष फायदा झाला नाहीं. साठलेला माल मात्र उठण्यास सहाय झालें. वर्षअखेर ह्या धंद्यासंबंधीं आशादायक परिस्थिति निर्माण झाली. जपानशीं सध्या चालू असलेल्या वाटाघाटींवर कपास कापडाच्या धंद्याचें भवितव्य अवलंबून आहे. कच्च्या मालाचें उत्पादन करणाऱ्या सर्व देशांस युद्ध परिस्थिति फायदेशीर होण्याजोगी होती, परंतु हिंदी कपास धंद्याची स्थिति अपेक्षेप्रमाणें सुधारली नाहीं.

"कापडाचे आणि सुताचे भाव ऑगस्टपर्यंत खालीं जात होते. उत्पादन कमी केलें, तरी मुंबईमधील गिरण्यांतील शिलकी मालाचा साठा वाढत जाऊन ऑगस्ट अखेर तो १ लक्ष, ८० हजार गांठींहून अधिक झाला. युद्धास प्रारंभ झाल्यावर ही प्रवृत्ति पालटली. १९३९ चे प्रारंभीं एकूण मागांपैकीं ३९% माग दोन्ही पाळ्या चालू होते. हें प्रमाण ऑगस्ट अखेर १५% वर आलें परंतु वर्षअखेर तें ३२% झालें.

**बसवलेले माग व चात्या**

| | माग | चात्या |
|---|---|---|
| १९३८ | २,००,२९६ | १,००,२०,२७५ |
| १९३९ | २,०२,४६४ | १,००,५९,३७० |

**गिरणी कामगार**

| | |
|---|---|
| १९३८ | १,१८,९९३ |
| १९३९ | १,१३,३३८ |

**सूत व कापड–आयात निर्गत**

| | १९३८ | १९३९ |
|---|---|---|
| सुताची आयात (पौंड) | ४,८२,०६,००० | ६,८२,३८,००० |
| कापडाची आयात (वार) | २२,०१,००,००० | २१,५२,११,००० |
| सुताची निर्गत (पौंड) | ३,००,५१,००० | २,११,४३,००० |
| कापडाची निर्गत (वार) | ६,८४,०४,००० | ६,०२,९४,००० |
| मुंबईतील गिरण्यांमधील कापडाची निर्गत (वार) | ३,८२,४९,००० | २,९४,२३,००० |

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि. पुणें.

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या गेल्या जानेवारींत भरलेल्या साधारण सभेंत एक सल्लागार मंडळ नेमण्याची सूचना स्वीकारण्यांत आली. तीस अनुसरून नेमलेल्या सल्लागार मंडळानें आपलें चौकशी करण्याचें व सल्ला देण्याचें काम चालविलें आहे. मंडळाच्या सूचनांचा विचार होऊन त्यांची अंमलबजावणीहि झाली आहे आणि होत आहे.

### रेडिओच्या सामुग्रीची वाढती आयात

रेडिओच्या सामुग्रीची आयात हिंदुस्थानांत सारखी वाढत असल्याचें कस्टम्सच्या गेल्या तिमाहीच्या आकड्यांवरून स्पष्ट दिसतें.

## करार कोठें झाला ?

**डेट कन्सीलिएशन बोर्डाचा हुकूम**

शंकर विष्णु ह्यानें नंदुरबार येथें माणेकलाल हरिदास गुजराथी ह्यांजकडून एका प्रॉमिसरी नोटीवर कर्ज काढलें. शंकर विष्णु ह्याची मध्यप्रांताचे हद्दींत मालकीची कांहीं जमीन होती.

१९३२ सालीं मध्यप्रांताचा डेट कन्सीलिएशन ॲक्ट पास झाला, त्याचा फायदा घेऊन शंकर विष्णूनें कन्सीलिएशन बोर्डाकडे अर्ज करून आपल्या कर्जाची तडजोड व्हावी अशी त्यास विनंति केली. माणेकलाल हरिदासानें आपल्या येण्याविषयीं तपशील सादर करावा, असा त्यास तडजोड बोर्डानें हुकूम केला, परंतु त्यानें तसें न केल्या कारणानें, कन्सीलिएशन ॲक्टान्वयें ज्याचें कर्ज फिटलें आणि कर्जदाराचें देणें राहिलें नाहीं, असें बोर्डानें जाहीर केलें.

सावकारानें नंतर नंदुरबार कोर्टांत कर्जदारावर प्रॉमिसरी नोटीचे रकमेसाठीं दावा लावला. डेट कन्सीलिएशन ॲक्टान्वयें तें कर्ज रद्द झालें आहे, ह्याचा प्रस्तुत दाव्यांत बचावासाठीं कांहीं उपयोग आहे काय ? असा प्रश्न उपस्थित झाला. पश्चिम खानदेशाच्या डिस्ट्रिक्ट जज्जानें सावकाराचे बाजूनें निकाल दिला, त्यावर हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें, तेंहि फेटाळण्यांत आलें.

**महत्त्वाचा मुद्दा**

मध्यप्रांताच्या डेट कन्सीलिएशन बोर्डानें रद्द केलेलें कर्ज वसूल करण्यासाठीं केलेला अर्ज मुंबई प्रांतांतील दिवाणी कोर्ट विचारांत घेऊं शकतें काय ?

प्रॉमिसरी नोटीचा व्यवहार कोणत्या कायद्याप्रमाणें केलेला आहे, हें तिचेमध्यें नमूद नसल्यास नेहेमीच्या पद्धतीप्रमाणें ज्या ठिकाणीं करार करण्यांत आला, तेथील कायदाच त्या करारास लागू पडतो. मध्यप्रांत आणि मुंबई हे दोन्ही प्रांत ब्रिटिश हिंदुस्थानाचेच भाग आहेत, परंतु त्या प्रांतांतील कायदे भिन्न असल्यास तेवढ्यापुरते ते प्रांत परराष्ट्रांप्रमाणेंच समजले जातील. नंदुरबार येथील करारास मुंबई प्रांतांतील कायदा लागू आहे; मध्यप्रांतांत अमलांत असलेल्या परंतु मुंबई प्रांतांत चालू नसलेल्या कायद्याप्रमाणें कराराची अंमलबजावणी झाली, तर ती कायदेशीर होणार नाहीं. तेव्हां, मध्यप्रांताच्या डेट कन्सीलिएशन बोर्डाचा हुकूम हा नंदुरबार येथें दाखल केलेल्या दाव्यांत कर्जदाराच्या सहायास येणार नाहीं, असा हायकोर्टानें निवाडा केला.

शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणासाठीं वेगवेगळ्या प्रांतांत कन्सीलिएशन बोर्ड स्थापन होत आहेत, तेव्हां प्रस्तुत दाव्यांत उपस्थित झालेल्या मुद्यास ह्यापुढें अधिकाधिक व्यावहारिक महत्त्व प्राप्त होईल, हें उघड आहे.

---

**कागदाच्या निर्गतीस प्रतिबंध**

हिंदी मालाच्या निर्गतीचें नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्यास एक तार पाठवून इंडियन पेपर मिल्स असोसिएशनच्या कमिटीनें त्यास आपल्या अडचणी कळविल्या आहेत. पेनांग आणि सिलोन ह्यांसारख्या ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांकडील निर्गतीसाठींहि लायसेन्स मिळत नाहीं, अशी असोसिएशनची तक्रार आहे. प्रत्यक्ष येथ ब्रिटनकडून मालास मागणी येत आहे, परंतु कागदाच्या निर्गतीवरील बंधनामुळें ती पुरविता येत नाहीं, असें कमिटीचें म्हणणें आहे.


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख १० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक— दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
| --- | --- | --- |
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि॰ पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ६

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, हरल प्रॉडक्टस कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
SHEVAK BROS.

Work-Shop Address: 153 Kasaba. Poona 2

Branch No. 1 Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११०—० |
| ४% १९४३ | १०४–१० |
| ३½% बिनमुदत | ९०—४ |
| ३½% १९४७–५० | १०१—६ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९०—४ |
| २¾% १९४८–५२ | ९५–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०३—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६१ ) | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | ११८—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १३४—८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | १०५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३५—२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १४७७—८ |
| मुंबई प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०१—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४०–११–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६३—०–० |

#### वीज

| | |
|---|---|
| मुंबई ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १२५—० |
| कराची ( १०० ) ९% | १९५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १८२—२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३१०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १५२५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% | ९३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) ११½% | १०२१—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८½% | ७७०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | २००—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४६—४ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | १८—७ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३७—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३३१५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ९% | २०५—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४७—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३४०—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १७७२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १११—८ |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्हीं. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.



PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.



'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

**दुसरी आवृत्ति तयार झाली.**

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केलया आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः--( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.